# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
# दापोली, जि. रत्नागिरी.

जा.क्र.उविम/मुळदे/ग्राकृमौसे/ 564 /२०२४, दिनांक 04 JUL 2024

## जाहिरात

विस्तार शिक्षण संचनालय, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली मार्फत उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथे कार्यान्वित ग्रामीण कृषि मौसम सेवा या योजनेमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ''निरीक्षक'' (Observer) हे पद भरावयाचे असून खाली नमूद अर्हता प्राप्त उमेदवारांकडून सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्हता प्राप्त उमेदवारांनी आपले अर्ज **दिनांक १९.०७.२०२४** कार्यालयीन वेळेपर्यंत **सहयोगी अधिष्ठाता/प्रमुख, ग्रामीण कृषि मौसम सेवा, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२०** या पत्त्यावर पाठवावेत. सदर पदासाठीच्या अर्हता प्राप्त पात्र व गुणवत्ता यादीनुसार पहिल्या पाच उमेदवारांच्या मुलाखती **सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२०** या कार्यालयामध्ये घेण्यात येतील.

| अ.क्र | प्रकल्पाचे नाव | पदाचे नाव व पदांची संख्या | काम करण्याचे ठिकाण | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रामीण कृषि मौसम सेवा, मुळदे | निरीक्षक (Observer) ०१ | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२०. | एकत्रित वेतन रु. ३३,६३५/— |

**पदांसाठींची आवश्यक शैक्षणिक पात्रता :—**

| अ.क्र | पदाचे नाव | आवश्यक शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १. | निरीक्षक | **अत्यावश्यक शैक्षणिक पात्रता :—** कोणत्याही शाखेतून १२ वी पास, मुलभूत संगणकीय ज्ञान ( MS-CIT व तत्सम परिक्षा उत्तीर्ण), मराठी टंकलेखन वेग — ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन वेग — ४० श.प्र.मि.<br>**इष्ट पात्रता :—** कमीत कमी २ वर्षाचा शास्त्रीय दस्तऐवज टंकलेखनाचा, शास्त्रीय नोंदी देखभालीचा अनुभव. ग्रामीण कृषि मौसम सेवा या योजनेमध्ये कार्यानुभव असणा—या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |

**अटि व शर्ती –**

१. वयोमर्यादा – खुल्या प्रवर्गातील उमेदवरांकरीता ३८ वर्षे व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरीता ४३ वर्षे राहील.

२. उमेदवारांनी विहीत प्रपत्रामध्ये पुर्ण तपशिल भरुन सादर करावा. अर्ज **सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग** यांचे नावे सादर करावा.

३. लखोटयावर **"निरीक्षक"** या पदासाठी अर्ज **"ग्रामीण कृषि मौसम सेवा"** या योजनेंतर्गत असे लिहीलेले असावे.

४. गुणवत्ता यादीनुसार प्रथम पाच उमेदवारांची निवड समितीद्वारे मुलाखत घेण्यात येईल.

५. मुलाखतीच्यावेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक.

६. मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता देय केला जाणार नाही.

७. मुलाखतीसाठी पात्र व अपात्र उमेदवारांची यादी, मुलाखतीचा दिनांक व वेळ विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. यासंबधी वेगळा असा कोणताही पत्रव्यवहार उमेदवारास केला जाणार नाही.

८. निवडलेल्या उमेदवारांने रु. १००/– किमतीच्या स्टॅम्प पेपरवर नियुक्ती कालावधी दरम्यान तो नोकरी सोडणार नाही आणि नेमुन दिलेले काम पूर्ण करेल आणि तो नियमित नियुक्तीसाठी दावा करणार नाही असे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

९. उमेदवाराला प्रकल्पातील नेमणुक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियमित आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

१०. उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाउ सूचना द्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

११. उमेदवाराचा अर्ज नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाकडे आहे.

१२. निवडलेल्या उमेदवारांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जेथे योजना कार्यरत आहे तेथे नियुक्ती देण्यात येईल.

१३. सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१४. जदा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.

१५. काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार संबधितांना राहतील.

१६. सदर तात्पुरती नियुक्ती अकरा महिने कालावधीकरीता राहील. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा तात्पुरत्या नियुक्त्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१७. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी–५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

१८. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास अमेदवाराची नेमणुक रद्द होउ शकते.

१९. कोणत्याही टपाल विलंबासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२०. कोणत्याही स्वरुपात राजकारणात सहभाग आढळून आल्यास उमेदवाराला या पदासाठी अपात्र ठरवले जाईल.

२१. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना – अ मध्ये अर्जासोबत सादर करावे.

२२. वयाचा लाभ/फायदा उमेदवाराकडून नॉनक्रिमीलेअर/जातीचा दाखला घ्यावा आवश्यक राहील.

२३. नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

२४. जन्मतारखेचा पुरावा जोडावा.

२५. प्रमाणपत्रे सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकीत असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक.

२६. अर्जावर उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा.

**सहयोगी अधिष्ठाता,**
**उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे**

प्रत माहितीकरीता —

१. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पूणे ४११ ००५.
२. मा. संशोधन संचालक, डॉ. बासाकोकृवि, दापोली/मफुकृवि, राहूरी/वनामकृवि, परभणी/डॉ.पंदेकृवि, अकोला
३. मा. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. बासाकोकृवि, दापोली/मफुकृवि, राहूरी/वनामकृवि, परभणी/डॉ.पंदेकृवि, अकोला
४. मा. शिक्षण संचालक, डॉ. बासाकोकृवि, दापोली/मफुकृवि, राहूरी/वनामकृवि, परभणी/डॉ.पंदेकृवि, अकोला
५. मा. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली
६. मा. सहयोगी अधिष्ठाता, वनशास्त्र महाविद्यालय, दापोली
७. मा. सहयोगी अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली
८. मा. सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, जि. रत्नागिरी
९. मा. सहयोगी अधिष्ठाता, काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर अभ्यासक्रम, किल्ले रोहा, कॅम्प ऑफिस, पहिला मजला, कृषि महाविद्यालय, दापोली
१०. प्रमुख, उद्यानविद्या विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
११. प्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
१२. प्रमुख, कृषिविद्या विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
१३. प्रमुख, कृषि किटकशास्त्र विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
१४. प्रमुख, वनस्पती रोगशास्त्र विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
१५. प्रमुख, कृषि अर्थशास्त्र विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
१६. प्रमुख, विस्तार शिक्षण विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
१७. प्रमुख, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
१८. प्रमुख, कृषि रसायन व मृदशास्त्र विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
१९. प्रमुख, कृषि अभियांत्रिकी विभाग, डॉ. बासाकोकृवि, दापोली
२०. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत
२१. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला
२२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बासाकोकृवि, दापोली

२/— त्यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रसिद्ध करण्यात यावी.

२३. कार्यालय नोटीस बोर्ड

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना

### प्रतिज्ञापन

### नमुना - अ

**(नियम ४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------------
श्री. ------------------------------------ यांचा / यांची मुलगा / मुलगी /पत्नी, वय ----------- वर्ष, राहणार ---------------------------------
---------------------------------------------------------------
याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ---------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला --------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक : २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेली मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक : २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**(उमेदवाराची स्वाक्षरी)**

ठिकाण :

दिनांक : / /